## नियमित दिवाणी दावा क्र.१/२०२३ मधील नि.क्र.५ व १७ वरील एकत्रीत आदेश
## (सुझलॉन गुजरात विंड पार्क लि. विरुध्द जिल्हाधिकारी सांगली वगैरे)
## (CNR NO.MHSN02-00033972022)

१. वादी यांनी मुळ दावा ठरावाकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. त्यामध्ये विशेषतः प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकतीमध्ये वादी यांचे विद्युत पोल व विद्युत वाहीन्या यास नुकसान पोचवू नये व दावा मिळकतीची व विद्युत वाहीन्यांची परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याकरीता व तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश होण्याकरीता प्रस्तुतचे अर्ज दाखल केलेले आहेत.

२. सदरहु अर्जांना अनुषंगून प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरहू अर्ज 'विना म्हणणे' चालविण्यात आले.

**वादींच्या तक्रारीला अनुषंगून अर्जांविषयची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

३. तासगाव तालुक्यामधील मौजे डोंगरसोनी हद्दीतील गट नं.३०१/ब एकूण क्षेत्र ३ हेक्टर १९ आर या मिळकतीमध्ये वादी कंपनीने सन २००५-२००६ मध्ये ८ विद्युत खांब व त्यास जोडलेल्या विद्युत वाहीन्या उभ्या केल्या होत्या. सदरची मिळकत ही 'दावा मिळकत' आहे.

४. वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकतीमध्ये वादी यांनी विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभा केल्याबद्दल तक्रारी केल्या, तसेच दिनांक ३०/०८/२०२२ रोजी सदरहु विद्युत वाहीन्या काढण्याबाबत प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे अर्ज केला. त्यानंतर दिनांक ०५/०९/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांना दावा मिळकतीतील उभे केलेले खांब काढून टाकण्याचे निर्देश दिले. त्यानंतर वादी यांनी सदरचे खांब काढून टाकले नाहीत. परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी पाठविलेले दिनांक

०५/०९/२०२२ रोजीचे पत्र हे बेकायदेशीर आहे अशी वादी यांनी मुळ दाव्यात ठरावाची मागणी केली आहे. तसेच वादी यांनी तथाकथीत मिळकतीमध्ये विद्युत खांब उभे केल्यामुळे किती नुकसान भरपाई होवू शकते हे देखील ठरवून मागितलेले आहे. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रतिवादी क्र.२ हे दावा मिळकतीमधील विद्युत वाहीन्यांचे नुकसान करतील अशी वादी यांना साधार भिती वाटत आहे. त्यामुळे दावा मिळकतीची 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याकरीता व तुर्तातुर्त ताकीदीकरीता वादी यांनी प्रस्तुतचे अर्ज दाखल केलेले आहेत.

५. सदरहु अर्जांना अनुषंगून प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दिलेले नसल्यामुळे वादीच्या तक्रारींचा विचार करुन खालीलप्रमाणे विवाद मुद्दे निश्चित करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय ? | **नकारार्थी.** |
| २. | न्यायाची तुला वादी यांच्या बाजूने आहे, ही बाब वादी यांनी शाबीत केली आहे काय ? | **नकारार्थी.** |
| ३. | 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबतचा व तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजूर केल्यास कोणास अधिक नुकसानीस सामोरे जावे लागेल ? | **प्रतिवादी क्र.२ यांस** |
| ४. | कोणता आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत** :-

६. सदरहु अर्जांना अनुषंगून वादी यांनी दावा मिळकती संदर्भातील व त्यांच्या

तक्रारी संदर्भातील कागदपत्रे केसच्या कामी सादर केलेली आहेत. त्याचा उल्लेख योग्य त्या ठिकाणी करण्यात येईल.

७. सदरहु अर्ज हे 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबत व तुर्तातुर्त ताकीदीबाबत असल्यामुळे केसचे गुणदोषावर विस्तृतपणे ऊहापोह करणे जरुरीचे नाही. सदरहु अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस कोणाचे बाजूने आहे व अर्ज मंजूर केल्यास कोणाचे मोठया प्रमाणावर नुकसान होईल इतकी मर्यादीत बाब विचारात घेणे जरुरीचे आहे.

८. सदरहु अर्जांना अनुषंगून दावा मिळकत भूमापन क्र.३०१/ब या नि.क्र.३/४ कडील ७/१२ उता–याचे अवलोकन केले. सदरहु मिळकतीच्या भोगवटादार सदरी प्रतिवादी क्र.२ भगवान पाटील यांचे नाव दिसून येते, परंतु त्याला कंस करण्यात आलेला आहे. त्या संदर्भातील फेरफार क्रमांक ७३५० वादी यांनी केसकामी दाखल केल्याचे दिसून येत नाही. सदरहु मिळकतीला लालासाहेब पाटील व सुधीर झांबरे यांचे देखील नाव भोगवटादार म्हणून दिसून येते. परंतु त्यांना वादी यांनी दाव्याचे कामी पक्षकार केलेले नाही. सदरहु ७/१२ उता–यावरुन एकूण दावा मिळकत ३ हेक्टर १९ आर इतकी विस्तीर्ण व एकक्षेत्री होती असे दिसून येते. सदरहु मिळकतीमधील हे.२.७९ आर मिळकतीला लालासाहेब पाटील व ४० गुंठे मिळकतीला सुधीर झांबरे यांचे नाव भोगवटादार म्हणून दिसून येते. त्यांच्या नावावर असणा–या मिळकतीच्या क्षेत्रफळाचे त्रैराशिक मांडले तर, प्रतिवादी क्र.२ भगवान पाटील यांनी त्यांची मिळकत लालासाहेब पाटील व सुधीर झांबरे यांना विकली असू शकेल असे प्रथमदर्शनी गृहीत धरता येवू शकते. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांच्या नावाला ७/१२ सदरी कंस करण्यात आलेला आहे. त्यामुळे वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.२ भगवान पाटील हे मालक आहेत अगर कसे ? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते.

त्यामुळे सदरहु मिळकतीला लालासाहेब पाटील व सुधीर झांबरे यांचे नाव भोगवटादार म्हणून कसे लागले व सदरहु मिळकत आज रोजी भगवान पाटील म्हणजेच प्रतिवादी क्र.२ यांच्या नावे मालक म्हणून आहे किंवा नाही ? याबाबत दाव्यामध्ये वादी यानी काहीही कथन केलेले नसल्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र.२ संदर्भात केलेल्या तक्रारी या प्रथमदर्शनी स्वीकारण्या योग्य वाटत नाहीत.

९. वादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये त्यांनी ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्यांच्या तारा जोडलेल्या आहेत. निर्विवादपणे सदरहु मिळकत ही वादी कंपनीच्या मालकीची आहे याबाबत कोणतेही कागदोपत्री पुरावे वादी यांनी केसकामी दाखल केलेले नाहीत. सदरहु मिळकतीमध्ये ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या जोडण्यासाठी वादी कंपनीने मुळ मालकांकडून संमत्ती घेतलेली होती, याबाबतचे देखील कोणतेही पुरावे वादी यांनी केसकामी सादर केलेले नाहीत. वादी यानी तथाकथीत दावा मिळकतीमध्ये ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या जोडण्यासाठी प्रतिवादी क्र.२ यांना काही नुकसान भरपाई दिलेली होती असे देखील वादी यांचे म्हणणे दिसून येत नाही. त्यामुळे जर वादींच्याच म्हणण्याप्रमाणे त्यांनी प्रतिवादी क्र.२ याच्या मालकीच्या असणा–या मिळकतीमध्ये ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभ्या केल्या असतील तर त्या त्यांनी कोणत्या अधिकारात केलेल्या होत्या ? याचे समाधानकारक स्पष्टीकरण वादी यांनी केसकामी नमूद करणे आवश्यक होते. परंतु वादींच्या दाव्यातील मांडणीवरुन त्यांनी प्रतिवादी क्र.२ ची संमत्ती न घेता दावा मिळकतीमध्ये ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभ्या केल्या होत्या म्हणूनच ते सदरहु कृतीबाबत नुकसान भरपाई देण्यास इच्छुक आहेत व ती नुकसान भरपाई किती होत आहे हे ठरवून मागण्याचा प्रयत्न करत आहेत असे दिसून येते. परंतु प्रतिवादी क्र.२ यांच्या मिळकतीमध्ये वादी यांनी त्यांच्या परवानगीशिवाय जर ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभ्या केल्या असतील तर त्याची नुकसान भरपाई किती होवू शकते हे ठरविण्याचे अधिकार केवळ प्रतिवादी क्र.२ यांना

आहेत. वादींच्या दाव्याच्या स्वरुपावरुन वादी हे नुकसान भरपाईची रक्कम ठरवून मागत आहेत, म्हणजेच वादी यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या मिळकतीमध्ये शिरकाव करुन ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभ्या केल्या आहेत हे त्यांना मान्य आहेत असे दिसून येते.

१०. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी वादीने त्याच्या मिळकतीमध्ये ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या बेकायदेशीरपणे उभ्या केलेल्या आहेत, त्या त्यांनी काढून घ्याव्यात म्हणून दिनांक ३०/०८/२०२२ रोजी मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना पत्र दिलेले होते. त्या पत्राला अनुषंगून मा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक ०५/०९/२०२२ रोजी वादी यांना पत्र पाठवून ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या या वादींच्याच मिळकतीमध्ये आहेत असे मोजणीमध्ये निष्पन्न झालेले आहे असे कळविण्यात आलेले होते. तसेच सदरचे ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या संदर्भात योग्य ती कारवाई करावी असे देखील जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी वादी यांना कळविलेले होते. सदरहु पत्र जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी पाठविल्यानंतर वादी कंपनी यांनी त्यांना दिनांक २८/०९/२०२२ रोजी पत्र पाठविलेले होते व त्यांनी ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या संदर्भात प्रतिवादी क्र.२ यांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यास ते तयार आहेत असे यापूर्वी उप विभागीय अधिकारी, मिरज यांना कळविलेले होते असे त्यामध्ये नमूद केलेले आहे.

११. अशा प्रकारे वादींच्या तक्रारींचा विचार करता गट क्र.३०१/ब या मिळकतीमध्ये वादी कंपनीने सन २००५ मध्ये बेकायदेशीररित्या ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभ्या केल्याबाबत प्रतिवादी क्र.२ यांनी अर्ज केलेला होता, तसेच त्या अर्जामध्ये गेली तीन ते चार वर्षे वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्यामध्ये त्या खांबांना अनुषंगून नुकसान भरपाईच्या रक्कमेबाबत काही बोलणी चालू झालेली होती असे देखील दिसून

येते. त्यामुळे तत्वतः प्रतिवादी क्र.२ यांच्या मिळकतीमध्ये वादी यांनी त्यांच्या संमत्तीविना ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभा केलेल्या होत्या असे वादींच्याच दिनांक २८/०९/२०२२ रोजीच्या जिल्हा पुरवठा अधिकारी यांना लिहीलेल्या पत्रावरुन दिसून येते. त्यामुळे वादी यांनी कोणत्या अधिकारामध्ये प्रतिवादी क्र.२ यांच्या मिळकतीमध्ये ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभा केलेल्या होत्या हे प्रथमदर्शनी दिसून येत नसल्यामुळे सदरहु विद्युत खांब व विद्युत वाहीन्यांच्या संदर्भात प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द कोणतेही आदेश पारीत करणे संयुक्तीक होणार नाही.

१२. वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्यामध्ये दाखल कागदपत्रांवरुन ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या वादी यांनी उभा केल्या याबाबत किती नुकसान भरपाई दयायची याबाबत बोलणी चालू आहेत. त्यामुळे ती नुकसान भरपाई किती दयायची हा पुर्णपणे वादी व प्रतिवादी क्र.२ यांचा स्वतंत्र विषय आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांच्या वैयक्तीक अधिकारात कोर्टाने हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांवरुन वादी यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या मिळकतीमध्ये ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या त्यांच्या परवानगीशिवाय उभ्या केलेल्या होत्या असे दिसून येत असल्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द तुर्तातुर्त ताकीदीचा व 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबतचा आदेश पारीत करणे संयुक्तीक होणार नाही. त्यामुळे वादी यांना प्रथमदर्शनी केस शाबीत करता येवू शकलेली नाही. तसेच न्यायाची तुला वादी यांच्या लाभात नाही. सबब मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत :–**

१३. मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आलेले आहेत. वादी यांना प्रथमदर्शनी केस शाबीत करता आलेली नाही. दाखल कागदपत्रांवरुन प्रतिवादी क्र.२ यांच्या मिळकतीमध्ये वादी यांनी त्यांची परवानगी न घेता ८ विद्युत खांब व विद्युत

वाहीन्या उभ्या केलेल्या होत्या असे एक प्रकारे वादी यांचेच म्हणणे दिसून येते. तसे वादी यांचे म्हणणे असल्यामुळेच वादी हे प्रतिवादी क्र.२ यांना नुकसान भरपाई देण्यास इच्छूक आहेत असे देखील दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांना त्यांच्या मिळकतीमध्ये वादी यांनी ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभ्या केल्याबाबत किती नुकसान भरपाई दयायचे हा संपूर्णपणे ठरविण्याचा अधिकार प्रतिवादी क्र.२ यांना आहे.

१४. आज या घटकेला दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याला प्रतिवादी क्र.२ यांच्या नावाला कंस झालेला आहे. तसेच लालासाहेब पाटील व सुधीर झांबरे यांची नावे दावा मिळकतीला भोगवटादार म्हणून समाविष्ठ करण्यात आलेली आहेत. त्यामुळे खरोखरच आज प्रतिवादी क्र.२ हा दावा मिळकतीचा मालक आहे व दावा मिळकत त्याच्या कब्जेवहीवाटीस आहे याबाबत कोणताही निष्कर्ष काढणे ही कठीण बाब आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ व्यतिरिक्त दावा मिळकतीला लालासाहेब पाटील व सुधीर झांबरे यांची नावे असल्यामुळे सदरहु मिळकतीची परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी असा आदेश केवळ प्रतिवादी क्र.२ यांचेच विरुध्द करणे संयुक्तीक होणार नाही. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र.२ च्या मिळकतीमध्ये त्यांच्या परवानगीशिवाय ८ विद्युत खांब व विद्युत वाहीन्या उभ्या केल्यानंतर देखील प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश करणे हा हुकूम प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द अन्यायकारक होवू शकतो. त्यामुळे जर 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द केला गेला तर प्रतिवादी क्र.२ यांना अधिक त्रासास व गैरसोईस सामोरे जावे लागेल असे मला वाटते. सबब, <u>मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष प्रतिवादी क्र.२ च्या</u> लाभात नोंदविण्यात येतो.

१५. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चा साकल्याने विचार करता, नि.क्र.५ व नि.क्र.१७ कडील अनुक्रमे वादींचा तुर्तातुर्त ताकीदीचा व 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा अर्ज

फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश खालीलप्रमाणे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा नि.क्र.५ व नि.क्र.१७ कडील अनुक्रमे तुर्तातुर्त ताकीदीचा व 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा अर्ज फेटाळण्यात येत आहे. |
| २. | अर्जांचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही. |
| ३. | सदर आदेशाची वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी नोंद घ्यावी. |

Abhay Ashok Mehendale

Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.02.01 17:40:50 +0530

**ठिकाण : सांगली.** **( अ. अ. मेहेंदळे )**

**दिनांक :३१.०१.२०२३.** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ३१.०१.२०२३ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | ०१.०२.२०२३ |